# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/आस्था/एचटीई - नोडल अधिकारी/२०२०/1974 दिनांक - २५.९.२०२०.

प्रति,

१. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित /कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७.

३. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६

४. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.

५. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

विषय - **महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाकरिता एचटीई सेवार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणी करिता नोडल अधिकारी नियुक्ती..**

संदर्भ - शासनाकडील दिनांक २५.९.२०२० रोजीची ई-मेल संदेश.

अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाकरिता एचटीई सेवार्थ प्रणाली कार्यरत आहे. या प्रणालिची विकसन आणि देखभालीची जबाबदारी महा आयटी यांचेकडे आहे. दैनंदिन येणा-या तांत्रिक अडचणींचे निराकरण याद्वारे केले जाते तथापि काही महाविद्यालये थेट त्यांच्या तक्रारींबाबत महा आयटी व प्रशासकीय विभाग यांचेकडे संपर्क साधतात. तथापि तक्रारीबाबत काही तपशील सहसंचालक कार्यालयाकडून महा आयटी व प्रशासकीय विभाग यांना आवश्यक असतो. थेट महा आयटी कडे संपर्क केल्याने तांत्रिक टीमला तो तपशील सहसंचालक कार्यालयाकडून घ्यावा लागतो व त्यामध्ये वेळेचा अपव्यय होतो तसेच थेट महाविद्यालय स्तरावरुन तक्रारी प्राप्त होताना त्यात प्रशासनाच्या कोणत्याही कार्यालयाची कमेंट अथवा जोडपत्र नसल्याने अशा प्रकारे खोटया तक्रारी येण्याचा देखील संभव असतो या सर्व बाबी विचारात घेऊन संबंधित तक्रारींचे निराकरण करण्याकरिता **श्री. अरविंद मधुकर भागवत - वरिष्ठ लिपीक यांची सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग पुणे साठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.**

१. तांत्रिक अडचणी मेलद्वारेच हाताळल्या जातील याकरिता खालील मेलवर संपर्क करावा..
payunit@jdhepune.info

२. कोणतेही / विद्यापीठ महाविद्यालय थेट प्रशासकीय विभाग किंवा महाआयटी यांचेशी मेल करणार नाही.

३. या संदर्भात विद्यापीठे व महाविद्यालये प्रथम सहसंचालक कार्यालयास मेल करतील व जर सहसंचालक स्तरावर अडचणींचे निराकरण होत नसेल तर सहसंचालक कार्यालयाकडून महाआयटी कार्यालयास मेल केला जाईल.

25/9/20

(डॉ. मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.